





मुंबई : मेट्रोसाठी मिठी नदीखालून जाणाऱ्या प्रस्तावित भुयारी मार्गाचे युद्धपातळीवर काम सुरू असून, भुयारीकरणाचे ८९ टक्के काम पूर्ण झाले आहे. या कामाची काही छायाचित्रे. (प्रथमेश गडकरी : सकाळ छायाचित्र सेवा)

# कफ परेड-बीकेसीपर्यंत सर्वाधिक मेट्रो

## मिठी नदीखाली मेट्रोच्या तीन बोगद्यांची कामे सुरू; भुयारीकरणाचे कामही प्रगतिपथावर

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. २७ : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो ३ मार्गाचे काम प्रगतिपथावर असून या मार्गावरील कफ परेड ते बीकेसीपर्यंत सर्वाधिक गाड्या चालवण्याचा निर्णय मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) घेतला आहे. कफ परेड ते बीकेसी आणि कफ परेड ते सीप्झ या मार्गांवर मेट्रो धावणार आहे. या मार्गावरील मिठी नदीखाली तीन बोगदे तयार करण्याचे काम सुरू आहे. धारावी ते बीकेसी दरम्यानच्या दोन बोगद्यांचे भुयारीकरणाचे सुमारे ८९ टक्के काम पूर्ण झाले असून एप्रिलअखेर ते पूर्ण होणार आहे.

एमएमआरसीने गुरुवारी (ता.२७) पत्रकारांसाठी कफ परेड आणि बीकेसी स्थानकाचा पाहणी दौरा आयोजित केला होता. कफ परेड स्थानकाचे काम ५२ टक्के पूर्ण झाले आहे. मेट्रो गाड्या थांबण्यासाठी या स्थानकात दोन स्टेबलिंग लाईन तयार करण्यात आल्या आहेत. एका स्टेबलिंग लाईनचे काम पूर्ण झाले असून दुसऱ्या मार्गाचे काम प्रगतिपथावर आहे. कफ परेडसह विधान भवन, चर्चगेट, हुतात्मा चौक ही स्थानके पॅकेज १ अंतर्गत येत असून याचे ६२ टक्के भुयारीकरण पूर्ण झाले आहे. तर या मार्गाच्या पॅकेज ५ मध्ये बीकेसीसह धारावी, विद्यानगरी व सांताक्रूझ स्थानके येतात. या पॅकेजचे एकूण ८९ टक्के भुयारीकरण पूर्ण झाले आहे.

बीकेसी स्थानक १८ मीटर खोल असून त्याची लांबी ४७४ मीटर आहे. या स्थानकात दोन स्टेबलिंग लाईन्स असणार आहेत. त्यापैकी एक बीकेसी स्थानकाच्या उत्तरेकडे; तर एक दक्षिणेकडे मिठी नदीखाली असेल. मिठी नदीखालून बोगदा खोदण्याचे काम पूर्ण झाले आहे. नदी क्षेत्रापासून ९ मीटरवर हा बोगदा आहे.

### या वर्षात ही कामे लागणार मार्गी

- सप्टेंबर २०२० पर्यंत प्रकल्पाचे १०० टक्के भुयारीकरण पूर्ण होईल.
- मेट्रो ३ ची पहिली ट्रेन डिसेंबर २०२० मध्ये मुंबईत दाखल होणार.
- मुख्य मार्गासाठी रूळ टाकण्याचे काम सुरू होणे अपेक्षित आहे.
- मेट्रो ३ ची स्थापत्यकामे ७० टक्के पूर्ण होतील.

बीकेसी परिसरात विशेष आर्थिक क्षेत्र व व्यावसायिक प्रतिष्ठाने असल्याने येथे दररोज असंख्य प्रवाशांची वर्दळ असते. कफ परेड ते बीकेसीदरम्यान अधिक गाड्या धावणार असल्याने या स्थानकात ३ मार्ग आहेत. गर्दीच्या वेळी गाड्यांचे जलद संचलन होण्यासाठी या लाईन्स उपयुक्त ठरतील. तसेच गाड्यांमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यास त्या लाईनवर उभ्या करण्यात येतील.
- एस. के. गुप्ता, प्रकल्प संचालक, एमएमआरसी

### प्रकल्पाची वैशिष्ट्ये



मेट्रो ३ प्रकल्पावर
**२७ स्थानके**

प्रकल्प खर्च
**२३,१३६ कोटी रुपये**

### हजारो कामगारांना फायदा

बीकेसी ते धारावी यादरम्यान भुयारीकरणाचे काम प्रगतिपथावर असून ते एप्रिलअखेर पूर्ण होणार आहे. बीकेसी रेल्वेस्थानकांनी जोडले गेलेले नाही. बीकेसीमध्ये हजारो कामगार काम करत असून त्यांना या मार्गाचा मोठ्या प्रमाणात लाभ होणार आहे. यासाठी कफ परेड ते बीकेसीदरम्यान अधिकाधिक सेवा चालविण्याचा निर्णय घेतला असल्याचे, एमएमआरसीच्या अधिकाऱ्याने सांगितले.

# बेस्ट, मेट्रोमुळे प्रदूषणाला आळा

## महापालिका आयुक्तांचा दावा

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता.२७ : बेस्टचा सध्या होत असलेला दुप्पट वापर आणि मेट्रो यामुळे शहरातील प्रदूषणाला मोठा आळा बसणार असणार असल्याचा दावा नियोजन प्राधिकरणाच्या प्रमुखांनी केला आहे. विजेवर चालणाऱ्या (इलेक्ट्रिक) बससाठी महापालिका स्वतः अपारंपरिक वीजनिर्मिती करणार असल्याचे महापालिका आयुक्त प्रवीणसिंग परदेशी यांनी आज सागितले.

मेट्रोचे ३५० किलोमीटरचे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर खासगी वाहनातून होणारे प्रदूषण ५० टक्क्यांनी कमी होईल, असा दावा मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाचे महानगर आयुक्त आर. ए. राजीव यांनी केला.

बेस्ट बसचा वापर पूर्वी दररोज ४० लाख प्रवासी करत. ही संख्या २२ लाखांवर आली होती. मात्र आता करण्यात आलेल्या अनेक उपायांमुळे ही संख्या पुन्हा ३५ लाखांवर गेली आहे. भविष्यात ही क्षमता दैनंदिन ८० लाख प्रवाशांपर्यंत नेण्याचे लक्ष्य असल्याचे आयुक्त प्रवीणसिंग परदेशी यांनी सांगितले.

**इंधनाचा वापर घटणार**

आता मेट्रो रेल्वेमुळे सार्वजनिक वाहतुकीचा चांगला पर्याय निर्माण होणार आहे. मेट्रोचे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर इंधनाचा वापर ३० टक्क्यांनी कमी होणार असल्याचा दावा राजीव यांनी केला.